Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# एका 'क्लीक'वर मिळणार पुस्तके

2 Sep 2010, 0442 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

म. टा. प्रतिनिधी

विविध भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती आता एका 'क्लीक' वर उपलब्ध होणार आहे. बुक गंगा डॉट कॉम या वेबसाइटवर देशभरात प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती मिळणार आहे.

देशभरात निरनिराळ्या भाषांमधे अनेक पुस्तके प्रकाशित होत असतात. त्यांची माहिती बऱ्याचदा भौगोलिक अंतर, भाषा बदल यांमुळे मिळू शकत नाही. यासाठी अनेक दुकाने पालथी घालावी लागतात. या अडचणींवर मात करण्यासाठी ही वेबसाइट सुरू केली असल्याची माहिती 'मायविश्व' या सॉफ्टवेअर कंपनीचे संचालक धनंजय दातार यांनी दिली.

वेबसाइटच्या माध्यमातून प्रकाशकांना जगभरातल्या वाचकांपर्यंत पोचता येईल. कोणत्याही पुस्तकांची माहिती विनामूल्य उपलब्ध करून देता येणार आहे. त्याचप्रमाणे जगभरात कुठेही पुस्तक पोचवता येणे वेबसाइटमुळे सहज शक्य होणार असल्याचे दातार यांनी सांगितले. ई बुकगंगा हे सॉफ्टवेअर साइटवरून डाऊनलोड करून पुस्तके वाचता येतील. प्रकाशकांना वितरणाचा आणि इतर खर्च नसल्यामुळे कमी किंमतीत ई बुक्स उपलब्ध करून देता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वेबसाइटवरे लेखक, प्रकाशक, पुस्तकांच्या नावाने वर्गवारी केलेली असल्याने हवे ते पुस्तक शोधणे शक्य होणार आहे. या वेबसाइटमुळे कमी किंमतीत पुस्तके उपलब्ध होतील. ई बुक्सच्या संकल्पनेमुळे जागेची बचत होईल शिवाय जगभरातल्या वाचकांपर्यंत क्षणात पोचता येईल. डेबीट किंवा क्रेडिट कार्डद्वारे खरेदी करता येणार आहे असे दातार यांनी नमूद केले.